## MAHARASHTRA ACT No. III OF 1973.

## THE SURGEON GENERAL WITH GOVERNMENT, ETC. (CHANGE IN DESIGNATIONS) ACT, 1972.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ५ जानेवारी १९७३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,
सह सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. III OF 1973.

## AN ACT TO AMEND CERTAIN ENACTMENTS ON ACCOUNT OF CHANGE IN DESIGNATIONS OF CERTAIN OFFICERS OF THE MEDICAL AND PUBLIC HELATH DEPARTMENTS OF THE GOVERNMENT OF MAHARASHTRA AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक १२ जानेवारी १९७३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ].

## सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

**महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय व आरोग्य विभागाच्या विवक्षित अधिकाऱ्यांच्या पदनामांमध्ये बदल केल्यामुळे विवक्षित अधिनियमितींमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या महाशल्यचिकित्सकाचे पद आणि महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य संचालकाचे पद रद्द करण्यात आले आहे ; आणि संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, आणि संचालक, आरोग्य सेवा ही पदे निर्माण करण्यात आली आहेत आणि राज्य शासनाने, दिनांक १ मे १९७० पासून, वैद्यकीय आणि आरोग्य विभागामधील इतर अधिकाऱ्यांची पदनामे आणि त्यांची कामे, वैद्यकीय, शिक्षण व संशोधन आणि आरोग्य सेवा या दोन संचालनालयांमध्ये पुन्हा नेमून दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, यापैकी काही अधिकाऱ्यांना, त्यांच्या पदासमवेत, असे पदधारक म्हणून विवक्षित निगम निकाय व इतर प्राधिकरणे यावरील सदस्यत्व व कामे मिळालेली होती ;

आणि ज्याअर्थी, असे निकाय आणि प्राधिकरणे यांचे सदस्यत्व व कामे चालू राहण्यासाठी किंवा त्यात फेरबदल करण्यासाठी, तरतूद करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, विवक्षित अधिनियमितीमध्ये सुधारणा करणे आणि त्यांच्याशी संबंधित बाबींची तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव आणि प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, शासनाचा शल्यचिकित्सक इत्यादी (पदनामात बदल) अधिनियम, १९७२ असे म्हणता येईल.

(२) तो, १ मे १९७० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

अधिनियमिती किंवा विलेख यांमधील निर्देशांचे अर्थान्वयन. २. त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीतील, किंवा कोणताही विलेख किंवा इतर दस्तऐवज यातील वैद्यकीय विभाग किंवा आरोग्य विभाग यासंबंधीचा किंवा या विभागातील कोणत्याही अधिकाऱ्यांसंबंधीचा कोणताही निर्देश, हा महाराष्ट्र शासनाचे वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय किंवा आरोग्य सेवा संचालनालय यांबाबतचा, किंवा शासन निर्णय, नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग, क्रमांक एमएमई. ३८६९/५९७५-(ए)-बी, दिनांक २० एप्रिल १९७० अन्वये, संबंधित संचालनालय किंवा यथास्थिती, अधिकारी यांना नेमून दिलेल्या कर्तव्यानुसार, अशा कोणत्याही संचालनालयातील सक्षम हुद्याचा अधिकारी यासंबंधीचा निर्देश आहे असा त्याचा अर्थ लावण्यात येईल आणि तो तसा निर्देश असल्याचे समजण्यात येईल.

विवक्षित अधिनियमितीची सुधारणा. ३. अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमितींमध्ये, याद्वारे उक्त अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये दर्शविलेल्या रीतीने आणि मर्यादेपर्यंत, सुधारणा करण्यात येत आहे.

व्यावृत्ती. ४. या अधिनियमाच्या प्रारंभी, कोणताही निगम निकाय किंवा इतर प्राधिकरण यावर आपल्या पदाच्या नात्याने, काम करणारे वैद्यकीय शिक्षण व संशोधन, आणि आरोग्य सेवा संचालनालयाचे सर्व अधिकारी हे, त्यावर यथोचितरित्या नेमण्यात आल्याचे समजण्यात येईल ; आणि अशा अधिकाऱ्यांनी केलेले कोणतेही कृत्य किंवा कारवाई ही, यथोचितरित्या केलेले कृत्य किंवा कारवाई असल्याचे आणि ते निगम निकाय आणि प्राधिकरण यांची यथोचितरित्या रचना करण्यात आल्याचे समजण्यात येईल आणि अशा रीतीने केलेले कृत्य किंवा केलेली कारवाई यासंबंधात, उक्त निगम निकाय किंवा प्राधिकरण याची यथोचितरित्या रचना करण्यात आली नव्हती किंवा त्यावर अधिकाऱ्यांची यथोचितरित्या नेमणूक करण्यात आली नव्हती याच केवळ कारणावरून, हरकत घेता येणार नाही.

## अनुसूची

(कलम ३ पहा)

| अधिनियमिती (१) | सुधारणा (२) |
|---|---|
| पुणे विद्यापीठ अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई वीस). | कलम १६, पोट-कलम (१) मधील "वर्ग १—पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील परिच्छेद (ब), खंड (पाच) मध्ये,—<br>(अ) "चार सदस्य" या मजकुराऐवजी "पाच सदस्य" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;<br>(ब) उपखंड (अ) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात येतील :—<br>"(अ) आरोग्य सेवा,<br>(अअ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन,". |

अनुसूची—चालू

| अधिनियमिती (१) | सुधारणा (२) |
| --- | --- |
| श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई एकावन्न). | कलम १५, पोट-कलम (१) मधील, " वर्ग १—पदसिद्ध सदस्य " या शीर्षकाखालील परिच्छेद (ब), खंड (तीन) मध्ये,—<br>(अ) " चार सदस्य " या मजकुराऐवजी, " पाच सदस्य " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;<br>(ब) उप-खंड (ब) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात येतील :—<br>" (ब) आरोग्य सेवा,<br>(बब) वैद्यकीय शिक्षण व संशोधन. ". |
| मुंबई विद्यापीठ अधिनियम, १९५३ (सन १९५३ चा मुंबई एकतीस). | कलम १६, पोट-कलम (१) मधील, " १—पदसिद्ध अध्याते " या शीर्षकाखालील परिच्छेद (ब) मध्ये, खंड (सात) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येतील :—<br>" (सात) आरोग्य सेवा संचालक,<br>(सात-अ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालक. ". |
| मराठवाडा विद्यापीठ अधिनियम, १९५८ (सन १९५८ चा मुंबई एकोणचाळीस). | कलम १६, पोट-कलम (१) मधील, " वर्ग १—पदसिद्ध सदस्य " या शीर्षकाखालील परिच्छेद (ब), खंड (सहा) मध्ये,—<br>(अ) " चार सदस्य " या मजकुराऐवजी " पाच सदस्य " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;<br>(ब) उप-खंड (अ) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात येतील :—<br>" (अ) आरोग्य सेवा,<br>(अअ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन. ". |
| शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महाराष्ट्र अठ्ठावीस). | कलम १७, पोट-कलम (१) मधील " वर्ग १—पदसिद्ध सदस्य " या शीर्षकाखालील परिच्छेद (ब), खंड (सात) मध्ये,—<br>(अ) " चार सदस्य " या मजकुराऐवजी " पाच सदस्य " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;<br>(ब) उप-खंड (अ) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात येतील :—<br>" (अ) आरोग्य सेवा,<br>(अअ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन. ". |
| नागपूर विद्यापीठ अधिनियम, १९६३ (सन १९६४ चा महाराष्ट्र बावीस). | कलम १६, पोट-कलम (१) मधील, " वर्ग १—पदसिद्ध सदस्य " या शीर्षकाखालील परिच्छेद (ब), खंड (सात) मध्ये,—<br>(अ) " तीन सदस्य " या मजकुराऐवजी " चार सदस्य " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;<br>(ब) उप-खंड (अ) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात येतील :—<br>" (अ) आरोग्य सेवा,<br>(अअ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन. ". |

अनुसूची—चालू

| अधिनियमिती (१) | सुधारणा (२) |
| --- | --- |
| महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र सेहेचाळीस). | (१) कलम ३, पोट-कलम (३) मधील खंड (अ-१) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येतील :—<br>" (अ-१) आरोग्य सेवा संचालक, **पदसिद्ध ;**<br>(अ-२) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालक, **पदसिद्ध.** ".<br>(२) कलम ११, पोट-कलम (१) मध्ये, " आणि महाराष्ट्र शासनाचा महाशल्यचिकित्सक, पदसिद्ध " या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—<br>" आरोग्य सेवा संचालक, **पदसिद्ध,** व वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालक, **पदसिद्ध.** ". |
| महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र चाळीस). | (१) कलम ३, पोट-कलम (३), खंड (अ) मधील उप-खंड (एक) व (दोन) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात येतील :—<br>" (एक) आरोग्य सेवा संचालक ;<br>(दोन) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालक, ".<br>(२) कलम १९, पोट-कलम (४) मध्ये, " वैद्यकीय सेवा उप-संचालक किंवा आरोग्य उप-संचालक " या मजकुराऐवजी " आरोग्य सेवा उप-संचालक किंवा वैद्यकीय शिक्षण व संशोधन उप-संचालक " हा मजकूर दाखल करण्यात येईल. |

(यथार्थ अनुवाद)

**न. ब. पाटील,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.